भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN


संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२९९ ■ शनिवार १ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

## मुंबईत अस्थापनांचे परवाने थेट रद्द करण्याऐवजी त्यांना सुधारणांच्या नोटीसा द्या, हायकोर्टाचे एफडीएला आदेश

**मुंबई, दि. ३१ : आम्ही याचिकाकर्त्यांना सुधारण्याची संधी देतो. तर, तुम्ही थेट परवाने रद्द करत आहात. आम्ही त्यांना सुधारपणेची नोटीस देतो, पुन्हा तपासणी करतो आणि त्यानुसार पुढची कारवाई होते. तुम्ही जे करतायत ते चांगलच आहे. लोक देखील कारवाईचे स्वागत करत आहेत. पण, तुम्ही थेट परवाने रद्द करत आहात. अशाने तुम्ही मुंबईतील अर्ध्या आस्थापना बंद कराल, अशा शब्दात न्यायालयाने एफडीएच्या अधिकाऱ्यांना खडसावले. त्यानंतर उच्च न्यायालयाचे म्हणणे लक्षात घेत अन्न आणि औषध प्रशासनाने त्रुटी आढळणाऱ्या अस्थापनांचा परवना रद्द करण्याऐवजी त्यांना सुधारणेची नोटीस देण्याचे मान्य केले.**



राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढेंची नियुक्ती झाल्यापासून या विभागाने कारवाईचा धडाका लावला आहे. काही दिवसांत गुटखा, भेसळ, औषधे आणि हॉटेल्सवरील अनियमितता आणि बेकायदेशीर बाबींवर बोट ठेवत कारवाई करण्यात येत आहे. त्यातच, एफडीएकडून नवी मुंबईतील एका पंचतारांकीत हॉटेलला टाळे ठोकण्यात आल्यानंतर हॉटेलच्यावतीने न्यायालयात याचिक दाखल करण्यात आली. याच अनुषंगाने सुरू असलेल्या कारवाईत मुंबई उच्च न्यायालयाने एफडीए अधिकाऱ्यांना चांगलंच सुनावले. संबंधित हॉटेलच्या परवाना रद्द केल्याची कारवाई रद्द करून सुधारणा नोटीस देण्याचे एफडीएकडून मान्य करण्यात आले आहे. न्यायालयात आज झालेल्या सुनावणीत अनेक घडामोडी घडल्या. न्यायालयाने एफडीएच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. एफडीएकडून मंत्रालयात तपासणी करण्यात आली तेव्हा मंत्रालयातील कँटीनला क्लीनचीट देण्यात आली. त्यावरुन, न्यायालयाने प्रश्न उपस्थित **(पान ४ वर)**

## भिवंडीत इमारत कोसळून दहा जणांचा जागीच मृत्यू

ठाणे, दि. ३० : भिवंडी शहरातील बालाजी नगर, गंगारामवाडी परिसरातील कोहिनूर अपार्टमेंट ही चार मजली इमारत कोसळून दहा जणांना जीव गमवावा लागला आहे. या भीषण दुर्घटनेची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. या दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश देत दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कारवाईचे निर्देश त्यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत. गंगारामवाडी येथील १२ ते १४ वर्षे जुनी असलेली कोहिनूर अपार्टमेंट ही इमारत अचानक कोसळल्याने मोठी भिती निर्माण झाली. दहा कुटुंबांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या दुर्घटनेनंतर कुटुंबीयांच्या आक्रोशाने उपस्थितांची मने हेलावली.

भिवंडीतील बालाजी नगर-गंगारामवाडी **(पान ४ वर)**

## धुळे जिल्ह्यात सर्वत्र पावसाची दमदार हजेरी आंबोडेत नदीच्या पुरात पिता-पुत्र वाहून गेले

**धुळे, दि. ३१ (प्रतिनिधी) - तालुक्यातील आंबोडे येथे कन्हेर नदीला आलेल्या पुरामध्ये पिता-पुत्र वाहून गेले. अन्य दोन जणही पुरात अडकले होते. पण, त्यांना बाहेर काढण्यात ग्रामस्थांना यश आले. वाहून गेलेल्या पिता-पुत्रांचा शोध सुरू आहे. आनंदा भागवत पारखे आणित्यांचा मुलगा दिनेश आनंदा पारखे, अशी बेपत्ता झालेल्या पिता पुत्रांची नावे आहेत. दोघांसह उमेश आनंदा पारखे यांच्यासह अन्य एक जण कन्हेर नदीलगत आज सकाळी दहाच्या सुमारास गेले. दरम्यान, साक्री तालुक्यातील तीन धरणे भरल्याने पांझरानदीत पाण्याचा विसर्ग वाढला आहे. त्यामुळे धुळे शहरातील गणपती मंदिराजवळील कमी उंचीच्या पुलांवरून पाणी वाहू लागले. त्यामुळे हे पुल वाहतुकीसाठी बंद केले.**




उद्याही जास्तीचा पाऊस होणार असल्याने शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. दरम्यान, आंबोडे येथे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी भेट देऊन नागरिकांशी चर्चा केली. सलग सात तास संततधार पाऊस झाल्याने शहरातील पोलिस मुख्यालय, जिल्हा रूग्णालयासह अनेक सखल भागात पाणी साचले. यंदाच्या मोसमात पांझरानदीला पहिल्यांदाच पूर आला. त्यामुळे सायंकाळी पूर पाहण्यासाठी नदीवरील पुलांवर नागरिकांनी गर्दी केली होती. **(पान ४ वर)**

## बाभळे एमआयडीसीत शिंदखेडा पोलिसांचा छापा पंधरा लाखांचा बनावट दारू कारखाना उध्वस्त

**शिंदखेडा दि. ३१(प्रतिनिधी ) - धुळे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या अ निर्देशांनुसार शिंदखेडा पोलिसांनी बाभळे (ता. शिंदखेडा) येथील एमआयडीसीमधील एका प्लॉट मधील निळ्या व पांढऱ्या रंगाच्या पत्र्याच्या शेडमध्ये बनावट देशी दारू च्या कारखान्यावर छापा टाकून सदर कारखाना उद्धवस्त केला. पोलिसांच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता, चंद्रकांत धुडकू विरारी (वय ३५ वर्ष, रा. माळी गल्ली, सोनगीर, ता. जि. धुळे) हा मटँगो पंचफ नावाची बनावट देशी दारू तयार करताना रंगेहाथ पकडला गेला. सदर बनावट दारू बनवण्याच्या कामात अजून कुणाच्या सहभाग आहे याचा शोध शिंदखेडा पोलीस घेत आहेत.**

पोलिसांनी संपूर्ण जागेची झडती घेतली असता ५ लाख रुपये किमतीची बॉटलिंग व कॅपिंग इलेक्ट्रीक चॅनेल मशिन, १ लाख ५० हजार रुपयांचा आर.ओ. प्लांट, ५,३२,००० रुपये किमतीचे मबॉबी संत्राफ देशी दारूचे १३३ बॉक्स, १,०४,००० रुपये किमतीचे 'भिंगरी संत्रा' देशी दारूचे २६ बॉक्स, ४,००० रुपयांचा मटँगो पंचफ दारूचा बॉक्स, तसेच ७५० लिटर स्पिरीटसदृश रसायन (किंमत ५०,००० रुपये), विविध फ्लेवर्स, मोजमापाची साधने, लेबलिंग टेप, ३६०० रिकाम्या बाटल्या, पुठ्ठ्याचे बॉक्स आणि इतर साहित्य असा एकूण १५,२१,७९६ रुपयांचा ऐवज जप्त केला. मानवी जिवासाठी अत्यंत घातक व अपायकारक ठरेल अशी बनावट दारू बनवणारा हा संपूर्ण कारखाना पोलिसांनी पूर्णपणे उद्धवस्त केला आहे. या कारवाईप्रकरणी **(पान ४ वर)**

## नंदुरबार जि. संततधार जनजीवन विस्कळीत

नंदुरबार, दि.३१(प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्ह्यात गेल्या काही तासांपासून सुरू असलेल्या सततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. नवापूर तालुक्यातील नागझरी-खोकसा रस्त्यावरील पुलावर पाणी आल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. प्रशासनाने पर्यायी मार्गाने वाहतूक सुरू केली असून नागरिकांनी आवश्यक तेवढाच प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, चांदसैली घाटात दरड कोसळल्याने घाटमार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद झाली आहे. संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली असून दरड हटविण्याचे काम हाती घेण्यात **(पान ४ वर)**

## जिल्हाधिकाऱ्यांकडून पूरपरिस्थितीचा आढावा; सतर्क राहण्याचे आवाहन

**धुळे, दि.३१० जिल्ह्यात सुरू असलेल्या संततधार पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी जिल्ह्यातील पूरपरिस्थितीचा आढावा घेत संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.**


जिल्हाधिकारी कार्यालयात आज पूरपरिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सोनवणे तसेच सर्व तहसीलदार, सर्व गट विकास अधिकारी, सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद, नगरपालीका, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, कार्यकारी अभियंता पाटबंधारे दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील पर्जन्यमान, नदी-नाल्यांची पाणीपातळी, धरणांमधून होणारा विसर्ग तसेच संभाव्य पूरस्थितीचा आढावा घेतला. महसूल, पोलीस, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, जलसंपदा, महावितरण, ग्रामपंचायती व स्थानिक स्वराज्य संस्थांनी परस्पर समन्वयाने कार्य करून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ मदतकार्य सुरू करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. त्यासाठी उपलब्ध असलेले शोध व बचाव साहित्य सुस्थितित ठेवावे.

अतिवृष्टीमुळे नदीकाठावरील किंवा **(पान ४ वर)**

## ॲड. माधवप्रसाद बाजपेयी अल्पशा आजाराने निधन

धुळे, दि.३१- शहरातील



जयहिंद कॉलनीतील रहिवासी, कान्यकुंज ब्राह्मण संघाचे अध्यक्ष तथा एस.टी.कामगाराचे नेते ॲड. माधवप्रसाद बाजपेयी (वय ७७) यांचे मुंबईत उपचार घेतांना निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या रविवारी (दि.१) दुपारी बाराला जयहिंद कॉलनीतील निवासस्थानापासून निघेल. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. ते चेतन व प्रशांत बाजपेयी, ॲड. रेखा बाजपेयी यांचे वडिल तर एस. टी. महामंडळातील अवस्थी यांचे सासरे होत.

## नंदुरबारला घरफोडी सोन्याचे दागिने चोरले

नंदुरबार, दि.३१(प्रतिनिधी)- शहरातील गांधीनगर परिसरात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून ४८,००० रुपये किमतीचे ४.०५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप (जोडवे) चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ जुलै रोजी रात्री ०८:०० ते २९ जुलै २०२६ रोजी रात्री ०८:३० दरम्यान ही चोरी झाली. फिर्यादी सुशिला राजू महाले (वय ५६, रा. प्लॉट नं. १०३, गांधीनगर, नंदुरबार) या घराबाहेर असताना अज्ञात चोरट्याने घराचे **(पान ४ वर)**

## दानपेटी चोरणाऱ्या दोघांना मध्यप्रदेशातून पकडले चांदीचे घोडे, आभुषणे सापडले; सहा गुन्ह्यांचा छडा

**शिरपूर दि.३१ (का.प्र.) : महाराष्ट्रात येऊन मंदिरे आणि घरे फोडून चोऱ्या करणाऱ्या दोघांना शहर पोलिसांनी मध्यप्रदेशातून अटक केली. त्यांच्याकडून सात लाख ८३ हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सहा गुन्ह्यांचा छडा लागला.**



याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सावळदे येथील दत्त मंदिराची २५ हजार रुपयांची रोकड असलेली दानपेटी चोरीची घटना जूनमध्ये घडली होती. या गुन्ह्याचा तपास करतांना पोलिसांनी संशयित सदीम गिलदार देवका (वय २७ वर्ष) व भिकला रामसिंह देवका (वय ३९ वर्ष, दोघे रा.नाहलाफल्या, मोहाला ता.सेंधवा) यांना अटक केली. त्यांची कसून चौकशी केल्यावर संशयितांनी शिरपुरातील तीन, मालेगाव, धुळे व सटाणा येथील एका चोरीची कबुली दिली. त्यांच्याकडून १९ हजार ३०० रुपयांची रोकड, सव्वादोन लाखांचा चांदीचा घोडा, दीड लाखांचे चांदीचे लहान घोडे, अडीच लाख रुपयांचे चांदीचे पाच मुकुट, **(पान ४ वर)**

## मनपा सहआयुक्त वाघ यांना मारहाण

धुळे, दि.३१- शहरातील साक्री रोडवरील फळविक्रेत्याने महापालिकेने ठरवून दिलेली साडे सातशे रूपयांची बाजार फी भरण्यास नकार देत जे होईल ते करून घ्या. असे म्हणून वजन काट्यावरील भांडे फळविक्रेता विशाल भटू शिंदे याने मनपाचे सहा.आयुक्त किशोर यशवंत वाघ यांना मारले. शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी फळविक्रेता विशाल शिंदे विरोधात शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहा.आयुक्त किशोर वाघ यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, साक्री रोडवरील कल्याणी डेअरी शेजारी असलेला **(पान ४ वर)**

## अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना त्वरीत ई-केवायसी पूर्ण करावी-भाग्यश्री विसपुते

**धुळे, दि.३१- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत कर्जमाफीसाठी धुळे जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांच्या याद्या जाहीर करण्यात आल्या असून, पात्र शेतकऱ्यांनी त्वरीत आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते (भा.प्र.से) यांनी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मनोज चौधरी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, तालुका उपनिबंधक महेशकुमार शाह, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रतिनिधी राहुल पवार तसेच विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते (भा.प्र.से) यांनी सांगितले की, राज्य शासनाने योजनेअंतर्गत धुळे जिल्ह्यातील ४७ हजार ३४४ शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांची माहिती पोर्टलवर अपलोड केली आहे. त्यापैकी २९ हजार १२ पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी आधार प्रमाणीकरणासाठी पोर्टलवर, संबंधित बँक शाखांमध्ये, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयात तसेच ग्रामपंचायत, गावचावडी आणि विकास संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या पात्र शेतकऱ्यांपैकी १० हजार ६५७ शेतकऱ्यांनी ई-केवायसी **(पान ४ वर)**

## अन्न व औषध प्रशासनाची कारवाई खांडबारा येथे बेकायदेशीर ताडी जप्त

**नंदुरबार, दि.३१ (प्रतिनिधी)- अन्न व औषध प्रशासनाने नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील खांडबारा येथे अन्न विक्री करणाऱ्या आस्थापनांची अचानक सखोल तपासणी केली. या कारवाईदरम्यान एका पेढीमध्ये अनधिकृतपणे ताडी विक्री केली जात असल्याचे उघडकीस आले. अस्वच्छ परिसर आणि अन्न परवाना किंवा नोंदणी न करता ही विक्री केली जात असल्याने प्रशासनाने कठोर पाऊल उचलत ३८ लिटर ताडी जप्त करून ती जागेवरच नष्ट केली. असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन सहायक आयुक्त (अन्न) सपना गोडसे पाटील यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.**

खांडबारा परिसरातील विविध अन्न आस्थापनांची तपासणी सुरू असताना एका विक्रेत्याकडे आवश्यक असलेला परवाना किंवा अधिकृत नोंदणी आढळली नाही. तसेच **(पान ४ वर)**

## बिलाडी धरणामुळे पुनर्वसनासाठी खामगाव ते मुंबई मोर्चा स्थगित

**नंदुरबार, दि.३१- बिलाडी लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत धरणाची उंची वाढवू नये आणि खामगाव गावाचे पुनर्वसन करावे या प्रमुख मागण्यांसाठी आज गावकऱ्यांनी खामगाव ते मुंबई पायी मोर्चा काढला. भर पावसात निघालेल्या या मोर्चाने प्रशासन आणि नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.**




खामगाव येथून निघालेला मोर्चा नंदुरबार मध्यम प्रकल्प कार्यालय येथे थांबवण्यात आला. बिलाडी धरणाची उंची वाढवण्यात येऊ नये. वाढवल्यास खामगाव गावाला पाणी आणि विस्थापनाचा धोका निर्माण होणार असल्याने गावाचे तातडीने पुनर्वसन करावे, अशी मागणी आंदोलकांची आहे.यावेळी प्रकल्पाच्या विभागीय अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांशी चर्चा केली. चर्चेनंतर अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिले की, सुधारित आराखड्यानुसार खामगाव गाव बुडीत क्षेत्रात येत नसले तरीही खास बाब म्हणून आदिवासी विकास विभागामार्फत गावाचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात येईल. यासाठी येत्या १५ दिवसात आदिवासी विकास मंत्र्यांसोबत बैठक घेऊन सर्व मागण्या मान्य केल्या जातील. यावेळी कार्यकारी अभियंता राहुल पाटील यांनी यासंदर्भात गावकऱ्यांना लेखी पत्र दिले.

प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर **(पान ४ वर)**

## वीस ह.ची लाच घेतांना समाज कल्याण विभागाचा अधिकारी विशाल चौधरी जेरबंद

**धुळे, दि.३१- येथील समाज कल्याण विभागातील वर्ग दोनचा अधिकारी विशाल चौधरी यास वीस हजार रुपयांची लाच घेताना पकडले. तक्रारदाराकडे बिल मंजुरीसाठी अधिकाऱ्याने पैशांची मागणी केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या धुळे येथील पथकाने सापळा रचून कारवाई केली.**

समाज कल्याण विभागांतर्गत तक्रारदाराने काम केले होते. त्या कामाचे दहा लाख रुपयांचे बिल मंजुरीसाठी पाठविण्यात आले होते. शासकीय बिल मंजूर करण्यासाठी समाज कल्याण विभागातील वर्ग-२ चा अधिकारी विशाल चौधरी याने तक्रारदाराकडे ३० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोड अंती २५ हजार रुपयांवर आली. त्या रकमेपैकी २० हजार रुपये घेण्याचे ठरले. याप्रकरणी तक्रारदारांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या येथील **(पान ४ वर)**



रेमन क्लॉथ स्टोअर्स
पारोळा रोड, धुळे फोन : (०२५६२) २८८४६०

## केळीची बोगस फळबाग दाखवून विमा उकळला, तीघांवर गुन्हा दाखल

**शिरपूर दि.३१ (का.प्र.) : तालुक्यातील सावळदे येथे शेतीमध्ये केळीची फळबाग नसतांनाही तिच्या नुकसानीची बोगस नोंद करुन एक लाख ८८ हजार रुपयांचा पीकविमा लाटल्याच्या संशयावरुन तीन जणांविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींमध्ये महिलेसह विमा कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांचाही समावेश आहे.**

शिरपूरचे प्रभारी तालुका कृषी अधिकारी मुकुंद ढोढरे यांनी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन पीक विम्याचा लाभ घेणाऱ्या विजया पाटील, बजाज आलियांझ जनरल इन्शुरन्स कंपनीचे तालुका समन्वयक पुष्पराज शत्रुघ्नसिंह जाधव (रा. आमोदे) व जिल्हा समन्वयक गौरव प्रेमसिंह गिरासे (रा. अमळथे ) यांच्याविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सावळदे येथील सर्व्हे नंबर ११९/१ मधील शेतीमध्ये २०२४-२५ मध्ये केळीच्या बागेचे नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झाल्याचे दाखवून विजया गुलाबराव पाटील (रा.सावळदे) यांनी नुकसान भरपाईसाठी दावा केला होता. त्याची पडताळणी करून त्यांना एक लाख ८८ हजार रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करून अदा करण्यात आली होती. या शेतात संयुक्त खातेदार असलेल्या अरुणाबेन नानाभाई पाटील यांनी त्याबाबत तक्रार केली होती. २०२४-२५ मध्ये खरीप हंगामात मका व रब्बी हंगामात हरभरा पेरला असतांनाही केळीची बाग दाखवून नुकसान भरपाई **(पान ४ वर)**

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,31,500 रु.+3% GST
सोने- 24 K -1,43,500 रु.+3% GST
चांदी- 2,24,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## ॥ ३० वे पुण्यस्मरण ॥



स्व.बापूसाहेब शिवाजीराव रायमल देवरे

नाही क्षण असा की,
तुमचे स्मरण नाही !
नाही श्वास असा की,
तुमचा भास नाही !
देह झिजवला सर्वांसाठी,
कष्ट केले अपार !
तुमची आठवण येताच,
डोळे भरती वारंवार !

स्व.बापूसाहेब शिवाजीराव रायमल देवरे यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !!

-: श्रध्दानवत :-

दादासो.श्री.सुभाष शिवाजीराव देवरे (अध्यक्ष)
दादासो.श्री.गुणवंत राजाराम देवरे (सचिव)
दादासो.श्री.विलास सुभाष देवरे (उपाध्यक्ष)
श्री.पंकज रघुनाथ पाटील (मुख्याध्यापक)
सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वृंद
अंध मुला-मुलींची शाळा, गणपतीरोड, धुळे

सुमनांजली सोहळा- दि.१ ऑगस्ट २०२६ बोरीस येथे सकाळी ८ वा.

# आपला महाराष्ट्र

## लोकमान्यांचे स्मरण आणि कालोचित भूमिका

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची आज १०६ वी पुण्यतिथी आहे.त्याच बरोबर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आहे.दोन्ही महापुरूष होते आणि त्या काळातील त्यांच्या भूमिका काळाशी आणि व्यवस्थेशी सुसंगत अशाच होत्या.पृथ्वी नागाच्या फळीवर उभी नसून कामगारांच्या तळहातावर उभी आहे असे ठाम प्रतिपादन अण्णाभाऊ साठे यांनी केले.तेच सत्य होते.या दोन्ही महापुरुषांना आमचे प्रणाम.टिळकांनी काँग्रेसचे नेतृत्व केले.तेव्हा स्वातंत्र्याचा लढा सुरू झाला होता. काँग्रेस अभिजनांपुरती मर्यादित असली तरी टिळकांचा उल्लेख तेल्या तांबोळ्यांचे पुढारी असाच होत असे. याचा अर्थ त्यांनी काँग्रेस प्रणित स्वातंत्र्याचा लढा सर्व सामान्यांपर्यंत पोहोचविण्यास सुरूवात केली होती.त्यांच्या नंतर गांधीजींनी ती चळवळ अठरापगड जाती जमातिंपावेतो नेली. १९०८ च्या राजद्रोहाच्या खटल्यात टिळकांना सहा वर्षांची मंडालेची शिक्षा झाली आणि त्यांचे वकील मोहम्मद अली जिना होते, या संबंधीची कागदपत्रे उपलब्ध आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या संग्रहात ते मौजूद आहेत. मंडालेच्या तुरुंगवासातच गीतारहस्याची निर्मिती झाली, हेही सत्य आहे .

तसेच टिळक-आगरकरांनी न्यू इंग्लिश स्कूल आणि पुढे डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून आधुनिक शिक्षणाची पायाभरणी केली.

आनंदीबाई जोशींना इंग्लंडला पाठविण्यासाठी टिळकांनी आपल्या समाजाशी मोठा संघर्ष केला, किंवा प्लेगच्या काळातील विशिष्ट अग्रलेखाचा अर्थ केवळ स्त्रियांच्या सन्मानाच्या संरक्षणापुरता होता, असेच विश्लेषण त्यातून बाहेर येते. किंवा तसे संदर्भ काढता येतील. देशकाल वातावरण किंवा त्या काळातील सामाजिक परिस्थिती नुसार काही वेळा राष्ट्रपुरूषांना सोयीच्या भूमिका घ्याव्या लागतात. त्या त्या काळाशी त्या सुसंगतच असतात. आजच्या सामाजिक मूल्यांच्या आणि परिवर्तनवादी भूमिकेशी बांधील असलेल्या काळाच्या चौकटीत त्या काळातील भूमिका किंवा तशा घटना बसत नाहीत.म्हणून काही ते लोक प्रतिगामी ठरत नाहीत.आज तशा प्रकारे त्यांना प्रतिगामी ठरविणे अयोग्य ठरेल.काही अती पुरोगामी स्वतःला म्हणविणारे न्या.रानडे,साने गुरूजी ते दाभोलकर यांनाही ब्राम्हण म्हणून नाकारतात तेव्हा त्यांच्या बुध्दिची कींव करावी तेवढी थोडीच ठरते.अलीकडच्या काळात काही परिवर्तनवादी विचारवंत सरसकट सर्वच ब्राह्मणांना ब्राह्मण्यवादी संस्कृतीचे वाहक मानतात आणि त्याच निकषाने लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचेही मूल्यमापन केले जाते. टिळकांच्या काही भूमिका निश्चितच चिकित्सेच्या आणि टीकेच्या अधीन आहेत. राजर्षी शाहू महाराजांशी पुराणोक्त प्रकरणावरून त्यांचे मतभेद झाले, ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. परंतु या एका संघर्षाच्या आधारावर टिळकांना संपूर्णपणे सनातनी, जात्यंध किंवा परिवर्तनविरोधी ठरवणे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अवमूल्यन ठरेल.

टिळकांचे व्यक्तिमत्त्व अनेक पदरी होते. एकीकडे ते परंपरेशी जोडलेले होते, तर दुसरीकडे आधुनिक शिक्षण, राजकीय जागृती आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध व्यापक जनमतनिर्मितीचे ते प्रभावी नेते होते. या कार्यामागे समाजाची बौद्धिक जडणघडण आणि राष्ट्रीय नेतृत्व निर्माण करण्याची भूमिका होती. टिळकांना ब्रिटिश सत्तेने भारतीय असंतोषाचे जनक म्हणून घोषित केले होते हेच त्यांच्या राजकीय भूमिकेचे महत्त्व दर्शविते. केसरी आणि मराठा या माध्यमांतून त्यांनी ब्रिटिश राजवटीवर कठोर टीका केली. त्यांच्या लेखनामुळे त्यांच्यावर राजद्रोहाचे खटले भरले गेले. १८९७ मध्ये त्यांना शिक्षा झाली आणि १९०८ मध्ये पुन्हा राजद्रोहाच्या आरोपाखाली सहा वर्षांची मंडालेच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. तुरुंगवासाला त्यांनी वैयक्तिक दुःख न मानता राष्ट्रकार्याच्या संदर्भात स्वीकारले. त्यांच्या राजकीय विचारांचा केंद्रबिंदू स्वराज्य हा होता.स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच अशी लोकमान्यांची घोषणा होती ती आणि मी शेंगा खाल्ल्या नाहीत म्हणून मी टरफले उचलणार नाही असे ठणकावून त्यांनी वर्गात सांगितले होते.या मुद्यांचाच उल्लेख शालेय अभ्यासक्रमात होता . अजुनही तेवढेच शिकविले जाते. त्यामुळे पिढ्यान पिढ्या तेवढेच टिळक माहीत आहेत.परिणामी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आलेख समाजा पर्यंत फारसा पोहचला नाही. राजर्षि शाहू महाराज यांच्याशी पुराणोक्त प्रकरणी दोहोंचे मतभेद असूनही टिळकांची पुण्यातील व्यवस्था महारांजांनी बघितल्याच्या नोंदी सापडतात.म्हणजे त्यांच्यात परस्पर संबंध प्रेमाचेच होते.असा निष्कर्ष निघतो. म्हणूनच टिळकांच्या जातीय भूमिकेचे मूल्यमापन करताना एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो.तो असा की, त्यांच्या भूमिकेचे संदर्भ त्या काळात कुठले होते. त्या भूमिकेमागे जातीय श्रेष्ठत्वाचा आग्रह होता की तत्कालीन राजकीय परिस्थितीत व्यापक राष्ट्रीय चळवळ उभी करण्याची रणनीती होती ही बाब तपासून न घेता त्यांच्या आयुष्याचे विष्लेषण करणे त्यांच्यावर अन्याय करणारे ठरेल.

याचा अर्थ टिळकांच्या सर्व भूमिका योग्यच होत्या असे आमचे म्हणणे नाही. पुराणोक्त प्रकरणातील त्यांची भूमिका, सामाजिक सुधारणांच्या काही प्रश्नांवरील त्यांची मते आणि शाहू महाराजांशी झालेले मतभेद यांची चिकित्सा वेळोवेळी झालेली आहे आणि होत राहील. परंतु त्याचबरोबर त्यांच्या राष्ट्रवादी भूमिकेची,त्याच्याशी बांधिल असलेल्या कार्याची आणि सामाजिक-सांस्कृतिक संदर्भातील गुंतागुंतीचीही चिकित्सा झाली पाहिजे.इतिहासात महापुरूष म्हणून किंवा थोर व्यक्तिमत्व म्हणून ज्यांची नोंद झालेली आहे त्या व्यक्तिमत्वांना नायक ठरविणे किंवा खलनायक ठरविणे अथवा त्या चौकटीत बसविणे योग्य होणार नाही. टिळकांच्या बाबत हाच संदर्भ लागू होतो. त्यांच्यात परंपरेशी नाते सांगणारा माणूस होता आणि त्याच वेळी ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध जनमत जागवणारा आधुनिक राजकीय नेता देखील होता. त्यांच्या कार्यामुळे शिक्षण, पत्रकारिता, सार्वजनिक उत्सव आणि राजकीय संघटन यांना राष्ट्रीय चळवळीशी जोडण्याचा एक नवा प्रयोग झाला.

त्यामुळे टिळक ब्राह्मण होते ,ब्राम्हण्यवादी होते ब्राह्मणांचेच हित ते बघत होते .असा निष्कर्ष काढणे इतिहासाची प्रतारणा करणारे ठरेल. चिकित्सा हवी, पण ती जातीय पूर्वग्रहातून नव्हे तर ऐतिहासिक संदर्भातून झाली पाहिजे.

विशेषतः आजच्या काळात जातीय संघर्षाच्या राजकारणाला इतिहासातील व्यक्तिमत्त्वांचा वापर करण्याची प्रवृत्ती वाढत असताना वास्तवता अधिक आवश्यक आहे. ब्राह्मण समाजातील एखाद्या व्यक्तीने केलेले कार्य ब्राह्मण म्हणून आणि त्याच्या राष्ट्रकार्याचे मूल्यमापन भारतीय नागरिक या नात्याने दोन्ही गोष्टी स्वतंत्रपणे पाहण्याची क्षमता इतिहासाच्या संदर्भातील दृष्टीकोनात असली पाहिजे.

टिळकांच्या निधनाचा दिवस भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातही विशेष महत्त्वाचा ठरला. त्याच दिवशी गांधीजींनी असहकार आंदोलनाची औपचारिक सुरुवात केली. टिळकांच्या राजकीय वारशाला गांधीजींनी आपल्या वेगळ्या पद्धतीने पुढे नेण्याचा प्रयतक केला, असे या घटनेतून दिसते. म्हणून टिळकांचे पुनर्मूल्यांकन जातीय गौरव किंवा जातीय द्वेष या दोन्हींपासून मुक्त असले पाहिजे.

## एन.सी.सी.च्या छात्रसैनिकांनी घेतली जलयोगाची अनुभूती

सोनगीर दि. ३१(प्रतिनिधी)- दिवसागणिक लोकप्रिय होत असलेल्या मजलयोगफ (वॉटर योग) या अभिनव योगप्रकाराची शेकडो एनसीसी छात्रसैनिकांनी आपल्या शिक्षक व अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष अनुभूती घेतली. येथील जिल्हा क्रीडा संकुलातील जल-तरण तलावावर आयोजित जलयोगाच्या प्रभावी प्रात्यक्षिकांनी उपस्थित सर्वांनाच मंत्रमुग्ध केले.

ज्येष्ठ समन्वयक महेश घुगे यांनी जलयोगाची मूळ संकल्पना, त्यामागील वैज्ञानिक आधार आणि आधुनिक धकाधकीच्या जीवनशैलीत त्याचे महत्त्व विशद केले.

डॉ. जगदीश गिंदोडिया यांनी जलयोगाचे शरीर व मनावर होणारे सकारात्मक परिणाम शास्त्रोक्त पद्धतीने स्पष्ट केले. या वेळी वयोवृद्ध साधकांनी पाण्यात अत्यंत सहजतेने योगासने व प्राणायामाची आव्हानात्मक प्रात्यक्षिके सादर केली. त्यांचा उत्साह आणि शारीरिक क्षमता पाहून तरुण छात्रसैनिक प्रेरित झाले.या कार्यक्रमास ४८ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, धुळे येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल मिश्रा, सुबेदार मेजर मो. इक्बाल, सुबेदार मेजर शशिकांत पाटील, सुबेदार रवींद्रजीत, एनसीसी ऑफिसर्स आणि पी.आय. स्टाफ यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. जगदीश गिंदोडिया यांच्या मार्गदर्शनाखाली हरिओम योग ग्रुपचे दिनकर पाटील, डी. व्ही. पाटील, पंढरीनाथ चित्ते, सुदाम पाटील, विलास पाटील, प्रकाश शिंपी तसेच डोंगरे महाराज योग ग्रुपचे कैलास पसारी, भरतभाई पटेल, सतीश खोंडे, कांतीभाई पटेल, राजू बोरसे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जलयोगाची विविध प्रात्यक्षिके यशस्वीरीत्या सादर केली.



## आशा स्वयंसेविकांचे थकीत मानधन द्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे मागणी

**धुळे, दि.३१- गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविका यांचे मार्च २०२६ पासून केंद्र सरकारचे थकीत मानधन व एप्रिल महिन्यापासुन राज्य शासनाचे मानधन मिळावे. या मागणीचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा व गटप्रवर्तक संघटना धुळे जिल्हाच्यावतीने देण्यात आले.**

निवेदनात नमुद केले आहे की, आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना कामाच्या मोबदल्यात मिळणारे मानधन अद्याप थकीत आहे. राज्य शासनाकडेही मागील दोन तीन महिन्यांपासून मानधन मिळालेले नसल्याने आशा स्वयंसेविका व गटप्रतर्वक आर्थिक अडचणीत सापडले आहे. मानधन त्वरीत मिळावे अशी मागणी कॉ.वसंतराव पाटील, शारदा पाटील, अनिता निकम, शालिनी सैंदाणे, योगिता पाटील, माधुरी शिंदे, सुनिता पाटील, कविता गर्दे,सरोज कुलकर्णी, रंजना जाधव, मंदाकिनी खैरनार यांच्यासह अनेक स्वयंसेविकांनी केली आहे.

## प.पू. दंडेवाले बाबा तपोभूमीत कार्यक्रम

धुळे, दि.३१-प.पू. सदगुरू दंडेवाले बाबांचा २७ वा ऊरूस सालाबादाप्रमाणे यंदाच्याही वर्षी दि.१ ते ३ ऑगस्ट २०२६ दरम्यान मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत वाडीभोकर रोड पंचायत समितीजवळील तपोभूमीत सायंकाळी ७ वा. धार्मिक कव्वाली, राष्ट्रीय एकात्मकतेची भक्तीगीते व भजने आयोजीत करण्यात आले आहे.

ऊरूस कार्यक्रमात महत्वपूर्ण मानली जाणारी संदल शरीफ मिरवणूक शोभा यात्रा दि.२ ऑगस्ट २०२६ रोजी सायं.६ वा. देवपूर पंचायत समिती जवळील प.पू. सदगुरू दंडेवाले बाबाजींचे तपोभूमी देवस्थान (तकिया) वाडीभोकर रोड येथून नेहरू चौक मोठा पूल -महात्मा गांधी पुतळा - नगरपट्टी ग.नं.६ पारोळा रोड महानगरपालिका समोरून स्वस्तिक चौक मार्गे बाबांच्या पांझरा नदी किनारी जवळील समाधी स्थळी जाईल. संदल कार्यक्रम समारोप प.पू. दंडेवाले बाबांच्या तपोभूमीत दि.३ ऑगस्ट २०२६ दिवशी सकाळी ११ ते ४ रोजी लंगर भंडारा महाप्रसादाचा कार्यक्रमाने होईल. संदल शरिफ निमित्त सर्व कार्यक्रमांचा लाभ भाविकांनी घ्यावा या सर्व कार्यक्रमास सर्व भाविकांनी उपस्थित रहावे असे अवाहन देवस्थानाच्या वतीने गोविंद साखला, ॲड. जवाहर पाटील, हिलाल माळी, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रथम महापौर भगवान करनकाळ, प्रफुल्ल पाटील, सुभाष पाटील, कबीर बोरसे, रविंद्र पाटील, विजय चौधरी, राजकुमार पाटील, जितेंद्र बोरसे, जयवंत वानखेडकर, चंद्रकांत जोगी, मुन्ना व समस्त सदस्य ऊर्स कमिटी आदिंनी केले आहे.

## साबण व्यावसायिकास तिघांनी केली मारहाण

धुळे, दि.३१-येथील देवपूर परिसरातील कुंडाणे रोडलगत एका व्यवसायिकास तीन जणांनी मारहाण केली. मारहाणीत व्यावसायिक गंभीर जखमी झाला असून त्याला रुग्णालयात दाखल केले.

उदयभान रामरक्षा यादव (३५, रा. तिरुपती नगर बिलाडी रोड देवपूर, धुळे) असे व्यवसायिकाचे नाव आहे. संशयित ताराप्रकाश यादव, संतोष ताराप्रकाश यादव, दिलीप बुद्धीराम यादव सर्व रा. धुळे यांनी शनिवारी (ता.२५) सायंकाळी सहाच्या सुमारास पूर्व वैमनस्यातून वाद घातला. दमदाटी करून लाकडी दांडा, फायटरने मारहाण केली. त्यात उदयभान यादव याला डोक्यासह हाता पायाला गंभीर दुखापत झाली. कुटुंबीयांनी त्याला श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सर्वोच्च रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी उदयभान यादव यांने दिलेल्या फिर्यादीनुसार मारहाण करणाऱ्या तिघा संशयीतांविरुद्ध देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

प्रकाश में आज मिशन कश्मीर




शशी कपूर, हेमा मालिनी, अमजद खान, प्राण, अशोक कुमार

## साधुग्राममधील सुविधा भाविकांच्या सुरक्षिततेला पूरक ठरावी- विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम

**नाशिक, दि.३१- सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे उभारण्यात येणाऱ्या साधुग्रामच्या नियोजनात भाविकांची सुरक्षितता, गर्दी व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था, नदी संवर्धन, जलनिस्सारण, आपत्कालीन सेवा, अखाड्यांच्या आवश्यक सुविधा तसेच भविष्यातील वाढत्या गरजांचा सर्वंकष विचार करून प्रत्येक सुविधा भाविकांच्या सुरक्षिततेला पूरक ठरेल, अशा पद्धतीने अंतिम आराखडा तयार करावा, अशा सूचना नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ प्रवीण गेडाम यांनी दिल्या.**




विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित साधुग्राम नियोजनाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस पोलीस आयुक्त डॉ संदीप कर्णिक, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक संजय ऐनपुरे, कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, नाशिक महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी डॉ. जयकुमार आढे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, महावितरणचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे, त्र्यंबक नगर परिषदेचे मुख्याधिकारी गोविंद जाधव, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, किशोर काळे तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नाशिक व त्र्यंबकेश्वर साधुग्रामसाठी विविध तांत्रिक निकषांच्या आधारे भाविकांची संख्या व सर्व पायाभूत सुविधांचे नियोजन करण्याबाबत सादरीकरण करण्यात आले. यावेळी विभागीय आयुक्त गेडाम यांनी घाटांची जास्तीत जास्त लांबी सर्वसामान्य भाविकांसाठी उपलब्ध ठेवावी. गर्दीची घनता कमी करण्यासाठी रस्ते, घाट, पार्किंग आणि पादचारी मार्गांचे

वैज्ञानिक नियोजन करावे, तसेच सर्व विभागांनी परस्पर समन्वयातून वेळबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करावीत, अशा सूचना दिल्या. महावितरणच्या उच्चदाब वीजवाहिन्यांमुळे प्रभावित होणाऱ्या भूखंडांचा आढावा घेऊन आरक्षण क्षेत्रातील कायमस्वरूपी रस्त्यांच्या सरेखनानुसार वीजवाहिन्यांचे पुनर्संरेखन करण्याचा पर्याय विचारात घेण्याबाबत चर्चा झाली. उर्वरित ठिकाणी आवश्यक तांत्रिक उपाययोजना करून साधुग्रामासाठी अधिक उपयुक्त जागा उपलब्ध करण्याचे नियोजन सादर करण्यात आले.

बैठकीत नाशिक व त्र्यंबकेश्वर साधुग्राममधील घाट, नव्याने विकसित होणारे घाट, नैसर्गिक नाले, रिंग रोड, पादचारी मार्ग, व्हीआयपी प्रवेश, रस्ते, अंतर्गत वाहतूक व्यवस्था, पार्किंग, नदी संरक्षित पट्टा, टेंट सिटी, अखाड्यांचे भूखंड, व्हीआयपी क्षेत्र, सांस्कृतिक व सार्वजनिक सुविधा, अतिरिक्त जागेचे नियोजन, उच्चदाब वीजवाहिन्यांचे पुनर्संरेखन, नैसर्गिक जलप्रवाह, जलनिस्सारण व्यवस्था, पादचारी मार्ग, कोडंबिका देवी ट्रस्टच्या जागेची चर्चा आणि स्वतंत्र ड्रेनेज आराखडा तयार करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. तसेच भविष्यातील विस्तारासाठी आवश्यक जागेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

साधुग्रामासाठी अतिरिक्त भूभागाचा समावेश, अखाड्यांच्या पारंपरिक स्थानांचा सन्मान राखून भूखंडांचे नियोजन, नदीकाठच्या भौगोलिक परिस्थितीनुसार घाटांचा विकास, भाविकांच्या सुरक्षित हालचालीसाठी रस्त्यांची योग्य रुंदी, बॅरिकेडिंग, पाणीपुरवठा, स्वच्छता, वीजपुरवठा आणि आरोग्य सुविधांचे एकात्मिक नियोजन यावरही बैठकीत चर्चा झाली.

यावेळी कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे प्रस्तावित साधुग्रामच्या आराखड्याचे सविस्तर सादरीकरण केले. मागील सिंहस्थातील अनुभव, विविध विभागांशी झालेली सल्लामसलत, प्रत्यक्ष स्थळ पाहणी, अखाड्यांच्या सूचना, अपेक्षित भाविकसंख्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या आराखड्याची माहिती त्यांनी दिली.

## शब्दकोडे क्रमांक : २४२४



**आडवे शब्द :** १.एखाद्या कार्य करण्यापूर्वी केलेले पूर्वतयारी ४.सवद-उलट लिहा ७.प्रगती ८.द्वेष ९.अरण्य १०.निवडणुकीत केलेली जाहिरात ११.इजिप्तमधील पिरामिड मध्ये ठेवलेले जतन करून ठेवलेले मृतदेह १२.छत्रपती संभाजी महाराजांनंतर स्वराज्याची धुरा वाहणारे थोर सेनापती फक्त नाव १४.जीभ १६.एखाद्या जुनाट आजावरील जालीम उपाय १८.कणीस १९.श्रीमंत २१.पठण २३.आई २४.ढीग २५.एखादी वस्तू हुबेहूब बनवण्यासाठी वापरतात तो विशिष्ट आकार २६.घड्याळाचा ठोका २८.गर्दी ३०.एखाद्या ध्येयाची लागलेली आस ३१.फणसाची एक जात ३४.कोशिंबीर ३६.भेग ३८.राग ३९.नोकरी ४०.सौतन ४१.फरसाण,पापडी,शेव मिसळून तयार होतो तो खाद्य पदार्थ ४३.बेदम चोप ४४.हलके गरम ४५.काटक ४६.तुज ४७.इंग्रजी ४८.तुरटीची चव ४९.आपला अवतीभवतीचा समाज उभे शब्द कुठलाही आकार नसलेला **उभे शब्द :** १. ज्याला कोणताही रूप किंवा आकार नाही असा २.शरीर स्वस्थ राहण्यासाठी आयुर्वेदाने सुचवलेला व्यायामाचा प्रकार ३.हिंदू पंचांगातील किंवा नवरात्रीतील नववी तिथी ५.अनंत अंबानी यांनी गुजरात येथील जामनगर येथे उभारलेले अभयारण्य वा वन्य पशुचिकित्सा केंद्र ६.मनात येणारी कल्पना ७. चार चाकी वाहन किंवा मोटार ११.एखादी गोष्ट करण्यास केलेली बंदी किंवा प्रतिबंध १२. तीव्र राग,चीड १३.राजस्थानातील एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक शहर १५. सर्वश्रेष्ठ, राजांचा राजा किंवा मुकुटमणी १७.व्यासपीठ २०.रियाझ २१.वाणी २२.शहर २५. पती किंवा पत्नीचे वडील २७.कर २९. घराचा वरचा मजला किंवा उंच गच्ची ३१. बहाणा किंवा थाप ३२. ज्याच्यावर गुन्हा केल्याचा आळ किंवा आरोप आला आहे असा व्यक्ती ३३. अपुरा ३५.सय-उलट लिहा ३७.एक प्रसिद्ध भारतीय उद्योग समूह ३९. थिल्लर, मस्करीखोर किंवा थट्टा मस्करी करणारा माणूस ४१. वस्तू पकडण्यासाठी किंवा स्वयंपाकघरात वापरले जाणारे साधन ४२.धोबी ४३. मावशीच्या नात्यातला ४५.फटाका ४६.आमटीवर तरंगणारा तेलाचा थर

**शब्दकोडे क्रमांक : २४२३ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खा | स | दा | र | ■ | वी | त | ■ | रा | न | वा | ट |
| र | वा | ■ | वा | र | णा | ■ | पा | ठ | ■ | य | ■ |
| ट | ■ | ता | न | सा | ■ | को | प | ■ | म | दा | र |
| ■ | सौ | ■ | गी | त | का | र | ■ | आ | ग | ■ | ज |
| वे | त | न | ■ | ळ | ■ | डा | य | न | ■ | प | त |
| ■ | न | का | र | ■ | वि | ■ | म | ■ | द | गा | ■ |
| अ | ■ | रा | ■ | म | शे | री | ■ | अ | ■ | र | शी |
| प | ल | ■ | प्र | ■ | ष | ■ | आ | यो | ग | ■ | त |
| ह | ■ | प्र | ति | क | ■ | स | ■ | ध्या | न | स्थ | ■ |
| र | ती | ■ | क्रि | ■ | पे | प | र | ■ | मॅ | ■ | प |
| ण | ■ | मा | या | वी | ■ | क | ■ | म | न | मा | नी |
| ■ | ब | घ | ■ | ट | प | ■ | वा | ती | ■ | मा | र |







### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज साो., ज्यु.डि. यांचे कोर्टात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.७०८/२०२६, नि.६,

१) जनाबाई गोकुळसिंग पाटील, २) नरेंद्र गोकुळसिंग पाटील, अ.नं.१ व २ रा.पिंप्री, पो.वाठोडे, ता.शिरपूर, जि.धुळे,
३) साधना नरेंद्र गिरासे, रा.उज्वला निवास जवळ, गुरूनानक शाळा जवळ, उल्हासनगर-४, उल्हासनगर, ठाणे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै.गोकुळसिंग शामसिंग पाटील हे दि.०५/०४/२०२२ रोजी मौजे- पिंप्री, पो.वाठोडे, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेगयुलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.२५/८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि.२७/०७/२०२६

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे — (शिक्का) — सहा.अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् साो., ज्युनि. डिव्ही. यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.६८९/२०२६, नि.६

१) शोभाबाई अनिल बोरसे, २) निखिलकुमार अनिल बोरसे,
३) लवकुमार अनिल बोरसे, सर्व रा.रथ गल्ली, वरचे गाव, शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी मयत अनिलकुमार उर्फ अनिल बन्सीलाल बोरसे हे दि.०९/०६/२०२६ रोजी मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेगयुलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.१/९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल. दि.२७/७/२०२६

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे — (शिक्का) — सहा.अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे




# शिरपुरला जोरदार पावसामुळे पुर दुकानात पाणी शिरल्याने मोठे नुकसान

**शिरपूर दि. ३१ (का.प्र.)- शहर आणि परिसरात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस झाल्यामुळे अनेर आणि तापी नदीला पूर आला आहे. शहरात पावसाचे पाणी शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या ग्राऊंड फ्लोअरच्या दुकानांत शिरल्यामुळे मोठे नुकसान झाले. होळनांथे मंडळात सर्वाधिक पाऊस झाला असून तेथील कपाशी केळीच्या शेतांमध्ये पाणी शिरले आहे.**

शहरातील करवंद नाका येथे राजपाल कॉम्प्लेक्सच्या तळमजल्यावर दुकानांत पावसाचे पाणी शिरले. नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी सायंकाळी उशिरापर्यंत पंपाने पाणी उपसण्यात आले. माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल या कामावर देखरेख ठेवून होते. होळनांथेसह परिसरात दमदार पाऊस झाल्यामुळे अनेर प्रकल्पातील पाणीपातळी वाढली आहे. सकाळी धरणातून २०,८८० क्यूसेक्स विसर्ग सुरु होता. दुपारी तीनला प्रकल्पाचे १० दरवाजे १.५० मीटर उघडून १६,०८० क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू होता. सध्या प्रकल्पात सध्या २२.४९ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा असून प्रकल्प ४७ टक्के भरला आहे. प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ९२.७० दशलक्ष घनमीटर आहे.विसर्ग सुरू असल्याने नदीकाठच्या गावांना प्रशासनामार्फत सतर्कतेचा इशारा देण्यात आला. अतिवृष्टीमुळे शेतांमध्ये पाणी भरले असून पिकांचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी वर्तवली. हतनूर प्रकल्पाचे चार दरवाजे पूर्ण उघडले असून ३१ दरवाजे दोन मीटरने उघडले आहेत. सकाळी नदीपात्रात एक लाख ८५ हजार ८२८ क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग सुरु होता. त्यामुळे नदी दुथडी भरुन वाहत आहे. नदीकाठावरील गावांना खबरदारीचा इशारा देण्यात आला. शहराजवळ अरुणावती नदीमधूनही पाण्याचा लोंढा वाहत आहे.

# स्वामी विवेकानंद स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात

दोंडाईचा, दि.३१(प्रतिनिधी)- शहरातील स्वामी विवेकानंद इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सुरेखा राजपूत होत्या. व्यासपीठावर जयश्री खारकर, मुमताज बोहरी तसेच ओम शांती केंद्राच्या समन्वयक वंदना दीदी व टीना दीदी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

✻ धुळे दि.३१- शहरासह जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावल्याने डासांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होवून डेंग्यु, मलेरीया आजारांची लागण होते. महापालिकेने प्रभाग निहाय अबेटींग, फॉगींग तसेच डास प्रतिबंधक फवारणीच्या कामाला त्वरीत सुरूवात करावी. ज्यामुळे नागरिकांचा आजारांपासून बचाव होईल. आरोग्य विभागाने युध्दपातळीवर फवारणीचे कामाला सुरूवात करावी अशी मागणी होत आहे.


**CHANGE NAME**

MY PREVIOUS NAME WAS **SALEHA MUHAMMAD AMEEN ANSARI** AND MY NEW NAME IS **SALEHA AKHLAK ANSARI**

ADD- 2312 GALI NO.7, TASHA GALLI, DHULE-424001

**CHANGE NAME**

MY PREVIOUS NAME WAS **JAMILABI IBRAHIM** AND MY NEW NAME IS **JAMEELA IBRAHIM ANSARI**

ADD- VADJAI ROAD AAZAD NAGAR, DHULE-424001

**CHANGE NAME**

MY PREVIOUS NAME WAS **HAJRABANO TAFAZZUL JALEEL** AND MY NEW NAME IS **HAJRA BANO TAFAZZUL JALEEL ANSARI**

ADD- 2532, MADHAVPURA PALA BAZAR LANE NO.14, DHULE-424001

**CHANGE NAME**

MY PREVIOUS NAME WAS **NAZMA QAISER AFZAL AHMED ANSARI** AND MY NEW NAME IS **ANSARI NAZMA QUAISER AFZAL AHMED**

ADD- ZAHABI VILLA, SR.NO.373, PLOT NO.9A, JAI SHANKAR COLONY, NEAR CHALISGAON ROAD, DHULE-424001

**CHANGE NAME**

MY PREVIOUS NAME WAS **TAFAZZUL JALEEL IFTEKHAR AHMED** AND MY NEW NAME IS **TAFAZZUL JALEEL IFTEKHAR AHMED ANSARI**

ADD- 2532, MADHAVPURA PALA BAZAR LANE NO.14, DHULE-424001


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** १) मौजे आर्वी ता. जि. धुळे येथील ग. नं. ३९४/३/अ चे क्षेत्र ६००० चौ. मी. (० हे. ६० आर) आकार ० रु. ८० पैसे वाणिज्य (हॉटेल) प्रयोजनार्थ बिनशेती झालेली शेतजमीन, यासी चतु:सिमा मंजूर ले-आऊट प्रमाणे.

येणे प्रमाणे मिळकतीचे मालक १) चंद्रकांत माधवराव बागुल, २) राजेंद्र माधवराव बागुल रा. आर्वी ता. जि. धुळे यांनी आमचे अशिले यांच्यासोबत सौदा केला आहे. सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ०७ दिवसानंतर आलेल्या हरकती लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचाही कोणतेही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिले असे.धुळे दि. ३१/०७/२०२६

**ॲड.उमेश व्ही. मुसळे**
कृष्णा सोसायटी नकाणे रोड, देवपूर धुळे ४२४००२
मो. ८४८३८७०६२८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक श्री.योगेश गोकुळचंद सिंगवी, रा.फागणे, ता.जि.धुळे यांनी आमचे अशिलांना कायम विक्री करण्याचा सौदा केला असून सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असून ती विक्री करण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा आमच्या अशिलांना दिलेला आहे.

सदरहु मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिलांना लवकरच पूर्ण करावयाचा आहे. सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, आरक्षण, मृत्यूपत्र, सॉल्वन्सी, हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबधीत योग्ये ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील व मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

परिशिष्ट :- मौजे अजंग, ता.जि.धुळे येथील शेत जमीन गट नं.६६/ब चे क्षेत्र ला ला. ० हे. ४० आर, आकार रू.१.८० पैसे, भोगवटादार वर्ग-१, यांसी चर्तु:सिमा- पुर्वेस : गट नं.५९, पश्चिमेस : गट नं.६६/अ, दक्षिणेस : गट नं.६०, उत्तरेस : गट नं.६७.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दिनांक- ३१/०७/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे,** नोटरी- भारत सरकार,
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे, **मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक श्री.योगेश गोकुळचंद सिंगवी, रा.फागणे, ता.जि.धुळे यांनी आमचे अशिलांना कायम विक्री करण्याचा सौदा केला असून सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असून ती विक्री करण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा आमच्या अशिलांना दिलेला आहे.

सदरहु मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिलांना लवकरच पूर्ण करावयाचा आहे. सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, आरक्षण, मृत्यूपत्र, सॉल्वन्सी, हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबधीत योग्ये ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील व मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

परिशिष्ट :- मौजे अजंग, ता.जि.धुळे येथील शेत जमीन गट नं.६६/अ चे क्षेत्र ला.ला. ० हे. ८३ आर, आकार रू.३.८० पैसे, भोगवटादार वर्ग-१, यांसी चर्तु:सिमा मंजुर गाव नकाशा प्रमाणे.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दिनांक- ३१/०७/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे,** नोटरी- भारत सरकार,
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे, **मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ५२४/३ पार्ट पैकी प्लॉट नं. ४९ चे एकूण क्षेत्र ३९६ चौ. मी. यास वि. सि. स. नं. ६४३५ चे एकूण क्षेत्र ३४८ चौ. मी, सत्ता प्रकार क येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत १) श्री. राजेश निर्मलकुमार साखला, २) श्री. योगेश निर्मलकुमार साखला ३) श्री. नितीन निर्मलकुमार साखला तिघे रा. सेवादास नगर, सुरत बायपास, धुळे यांचे हिस्से राशीने मालकीची असून या पैकी पुर्वेकडील भागाचे क्षेत्र २४४ चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. ५०, पश्चिमेस : याच प्लॉट नं. ४९ पैकी भाग, दक्षिणेस : फॉरेस्ट एरिया, उत्तरेस : रस्ता येणे प्रमाणे मिळकत हिस्से राशीने १) श्री. योगेश निर्मलकुमार साखला २) श्री. नितीन निर्मलकुमार साखला यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत श्री. राजेश निर्मलकुमार साखला यांचे संमतीने कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलाशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. सदरहू मिळकतीस अनुषंगुन लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था मर्या. धुळे याचा कर्ज बोजा प्रलंबित आहे. तरी या व्यतिरिक्त सदरहू मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, रक्कम देणे/घेणे, आरक्षण, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे मुळ दस्त जमा/ तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दिनांक ३०/०७/२०२६

**ॲड.विजय म. मोरे** नोटरी भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम जनता, सर्व कौटुंबिक, सामाजिक व व्यावसायिक हितसंबंधित, सर्व पतसंस्था, राष्ट्रीयकृत वित्तीय संस्था, सुक्ष्म व गृह अर्थसहाय्य संस्था, खाजगी अर्थसहाय्य कर्ता, शासकीय-निमशासकीय कार्यालये, गृहनिर्माण सोसायट्या, नोंदणी कार्यालय, महानगरपालिका, महसूल नगर भूमापन विभाग, म. रा. वि. वि. कं. आदी तसेच या नोटीसीतील मिळकतीचे पुर्वोक्त खरेदी - विक्री कर्ता यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी **श्रीमती किरण दिनेश शर्मा** यांचे प्रत्यक्ष कब्जे उपभोग व वहिवाटीतील तुकडी जिल्हा धुळे, पोट तुकडी, तालुका धुळे पैकी मौजे धुळे महानगरपालिका हद्दीतील धुळे-१ येथील निवासी मिळकत म्हणजेच..

मौजे नगर भूमापन क्र. ४४५३/क चे क्षेत्र १३३.८० चौ. मी. सत्ता प्रकार ड चा भूखंड व त्यावर असलेले जुने माती - धाब्याचे निवासी बांधकामासह अशी निवासी वापरात असलेली मिळकत ज्यासी मापे पुर्व:पश्चिम १५.०० मी. व दक्षिण - उत्तर ३३.०० मी. यासी चतु:सिमा पुर्वेस : श्रीमती अंजनाबाई मराठे यांचे घर, पश्चिमेस : श्री पुकळकर यांचे घर, दक्षिणेस : श्री. पाटील यांचे घर व उत्तरेस : मुख्य वापर रस्ता, अशी मिळकत दिर्घ कालावधीपूर्वी निश्चित केल्याप्रमाणे कायम स्वरुपी विकत घेण्याचा रितसर व्यवहार लिखित नोंदणीकृत दस्ताने आपसातील किंमतीपोटी बयाणा रकमेचा पूर्ण भरणा अदा करुन कायम केलेला आहे.

तरी सदरहू निवासी मिळकतीसंबंधी कोणाचेही काही एक व्यवहार असल्यास व नियोजित व्यवहाराचे पुर्ततेस कोणाही संबंधितांचे काही एक म्हणणे, हरकत/हरकती आक्षेप असल्यास आणि/ किंवा या मिळकतीशी कोणत्याही प्रकारचे तोंडी व लेखी हक्क - हितसंबंध अथवा काही एक व्यवहार जोडलेले असल्यास, त्याबाबत लिखित वा दस्त ऐवजी सपुराव्याने खालील स्वाक्षांकित यांचेकडेस या जाहीर नोटीस प्रसिद्धीपासून ११ (अकरा) दिवसांचे आंत सादर करावयात. तोंडी अथवा या मुदतीनंतर आलेल्या तसेच परस्पर वृत्तपत्रातून प्रसिद्ध केलेल्या कोणाच्याही कोणत्याही हरकती कदापी विचारांत घेतल्या जाणार नाहीत व सदरची मिळकत ही निर्वेध असल्याचे ग्राह्य धरण्यात येईल. ओघानेच या मुदतीनंतर आलेल्या हरकती व आक्षेप हे बेकायदेशीर व रद्दबातलच ठरतील याची नोंद घ्यावी.

वर नमूद मुदतीत कोणाच्याही काही एक सपुरावा हरकत/हरकती न आल्यास वर नमूद मिळकतीसंबंधी अंतिम नोंदणीकृत व्यवहार सोयीनुसार करण्यास आमचे अशिल मुक्त राहतील याची संबंधितांनी विनंती नोंद घेणेस्तव ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दिनांक ३१/०७/२०२६

**ॲड.नितीन कन्हैय्यालाल गुजराथी**
४४,नगरपट्टी, पाटबाजार, गांधी पुतळ्याजवळ, धुळे
कार्य : जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे
मो. ९४२३९६३४३२/९८८११७१४७९

## जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेशचा जाहिरनामा

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार शहादा जि. नंदुरबार यांचे न्यायालय अंतर्गत प्रसिद्धी नोटीस**

क्रमांक/जन्म मृत्यू/कावि ४९/२०२६
तहसिलदार यांचे कार्यालय शहादा
दि. २२/०६/२०२६

श्रीमती उषाबाई सतिश पानपाटील
रा. कोठली त. सा. ता. शहादा जि. नंदुरबार ... अर्जदार

विरुद्ध

जन मृत्यू निबंधक अधिकारी
कोठली त. सा. ता. शहादा जि.नंदुरबार . ..सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार श्रीमती उषाबाई सतिष पानपाटील रा. कोठली त. सा. ता. शहादा जि. नंदुरबार असून त्यांचा मुलगा नामे दादाभाई सतिष पाटील यांचा जन्म दि. ०१/०६/१९८९ रोजी कोठली त. सा. ता. शहादा जि. नंदुरबार येथे झाला असून त्यांची जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय कोठली त. सा.ता. शहादा जि.नंदुरबार येथे नसल्याने व सदरील जन्म हा एक वर्ष पुढील असल्याने अर्जदाराने दि. ११/०८/२०२३ जन्म मृत्यू सुधारणा अधिनियम २०२३ चे कलम ११ (३) अन्वये जन्म दाखला मिळणेसाठी शहादा येथील मा. कार्यकारी दंडाधिकारी शहादा यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील प्रमाणे अर्जात नमूद केलेल्या माहिती विषयी कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दिनांक १६/०७/२०२६ रोजी किंवा १५ दिवसांच्या आत सुनावणी पूर्वी समक्ष अथवा वकीलामार्फत शहादा येथील कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालयात हजर राहून लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी कोणीही व्यक्ती स्वत: अगर आपल्या वकीलामार्फत हजर न राहिल्यास पुढील योग्य ते हुकूम होईल याची नोंद घ्यावी.

आज दि. २२/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

साक्षरी /
**(संभाजी पाटील)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार शहादा

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सातरणे ता. जि. धुळे येथील ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन गट नं. ५/१/क क्षेत्र १ हे. ८६ आर. पैकी ला. ला. क्षेत्र ० हे. ५० आर. पो. ख. क्षेत्र ० हे. १५ आर एकूण क्षेत्र ० हे. ६५ आर आकार १ रु. ९१ पैसे यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे.

पुर्वेस : सातरणे-मोहाडी प्र. डांगरी रस्ता
पश्चिमेस : याच गटाचा उर्वरित भाग
दक्षिणेस : नाला
उत्तरेस : याच गटाचा उर्वरित भाग

येणे प्रमाणे वर्णनाच्या व चतु:सिमेच्या आतील मिळकतही **भुषण माणिक सुर्यवंशी** रा. नावरा नावरी, ता. जि. धुळे यांचे मालकीची व ताबे उपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तसेच मिळकत, हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाट, बक्षिस, मृत्यूपत्र, सौदा पावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कळवावी.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ही नोटीस आमच्या अशिलांच्या सुचनेनुवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. स्थळ : धुळे दिनांक ३०/०७/२०२६

**ॲड.प्रशांत आर. कोठारी**
३१/१, प्रोफेसर कॉलनी, देवपूर, धुळे **मो. ९८८१३८८१९९**

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.दिवाणी जज्ज सो., ज्युडि यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.६५२/२०२६, नि.६,

सुरेखाबेन राजूभाई चव्हाण वैगरे ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही ....जाबदेणार

ज्या अर्थी अर्जदार न.१ ते ४ हे मयत कै.राजूभाई देवरामभाई चव्हाण यांचा दि.३१/०५/२०२४ रोजी खर्दे बु. ता शिरपूर मृत्यू झाला असून मयतास अर्जदार न.१ ते ४ यांचे व्येतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार आणि मयत हे मुळचे खर्दे बु पोस्ट उंटावद ता.शिरपूर जिल्हा धुळे येथील राहनारे आहेत. अर्जदार यांना मयत कै. राजूभाई देवरामभाई चव्हाण यांचा यांचेवारस दाखल्याची आवश्यकता असलेने अर्जदार यांने बॉम्बे रेगुलेशान कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी/ वारसांचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केला आहे.

त्या अर्थी या नोटीसीने तमाम जनतेस कळविणेत येते की, तमाम जनते पैकी वरील मयताचे अर्जदार यांचे व्येतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर दिनाक ११/८/२०२६ रोजी ठीक सकाळी १०.३० वा स्वत अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी स्वरुपात हरकती सादर करावे अन्यथा सदरील अर्जदार यांचा तोंडी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदार यांचे व्यतिरिक्त दुसरे कोणीच मयताचे वारस नाहीत असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाण पत्र अर्जदार यांस मागणी प्रमाणे देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही मे.न्यायाधीश सो कनिष्ट स्तर शिरपूर जिल्हा धुळे यांचे आदेशावरून सदरची नोटीस प्रसिद्धीस दिली असे.

आज रोजी माझ्या सहिनी व कोर्टाचे शिक्कायानिशी प्रसिद्धीस दिली असे.

**कनिष्ट लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) **सहाय्याक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो., कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात**

दि.कि.अर्ज नं.६०९/२०२६, नि.६,

१) बेबीबाई गोपीचंद पाटील, २) विनोद गोपीचंद पाटील,
रा.१०४, स्वप्नपूर्वी स्कीम, बी-विंग मेदनकर वाडी,
शिक्षक कॉलनी, चाकण (पुणे)
३) प्रमोद गोपीचंद पाटील, अर्जदार नं.१ व ३ रा.बाळदे,
ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही ....जाबदेणार
गोपीचंद मुकुंदा पाटील, रा.बाळदे ता.शिरपूर, जि.धुळे,
मृत्यू दिनांक- १४/०७/२०२५ ....मयत

ज्या अर्थी अर्जदार यांनी मे.शिरपूर न्यायालयात मयत गोपीचंद मुकुंदा पाटील हे दिनांक १४/०७/२०२५ रोजी उपचारा दरम्यान ससून रुग्णालय पुणे येथे मयत झाले असून, अर्जदार यांना वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दि.१२/८/२०२६ रोजी ठीक सकाळी १०:३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक २२/७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरून

सही/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सही/- **सहा.अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., (ज्यु.डि.) यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.६३९/२०२६, नि.६,

१) प्रकाश रामभाऊ पाटील, २) कैलास रामभाऊ पाटील,
३) शोभाबाई रविंद्र पाटील, ४) गुणवंत रविंद्र पाटील,
५) सविता सचिन वानखेडे,
६) सुनंदा अशोक पाटील ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी मयत रामभाऊ ढबु पाटील हे दि.२३/०५/२०२४ रोजी मौजे- अर्थे बु., ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले असून, आता अर्जदार नं.१ ते ६ यांना शासकीय व निमशासकीय कामांसाठी व अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसासंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दिनांक २०/८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होऊन हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि.२९/०७/२०२६

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे (शिक्का) **सहा.अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनि.डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.६७५/२०२६, नि.७,

सुशिलबाई राजेंद्रसिंग सिसोदिया,
उ.व.७० वर्षे, धंदा- घरकाम,
रा.पळसनेर, ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी मयत राजेंद्रसिंग बंडूसिंग सिसोदीया हे दि.२१/०५/२०२६ रोजी मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेगयुलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.२०/८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/ आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि.२९/०७/२०२६

आदेशावरून

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे (शिक्का) **सहा.अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.दिवाणी जज्ज सो., यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.६०१/२०२६, नि.६,

भारतीबाई उर्फे भारतीबेन सोमा उर्फे सोमभाई माळी ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही ....जाबदेणार

ज्या अर्थी अर्जदार ही मयत कै.राजकुमार उर्फे राजूभाई सोमाभाई बाविस्कर (माळी) ची जन्म दाती आई असून कायदेशीर वारस आहे. मयत मयत कै. राजकुमार उर्फे राजूभाई सोमाभाई बाविस्कर (माळी) याचा वलसाड जिल्हा वलसाड येथे दि.१०/०२/२००८ रोजी मृत्यू झाला आहे. मयताचे व अन्य त्याचे नातेवाईकांचे नावे मौजे उंटावद तालुका शिरपूर येथे शेत जमीन गट न.१४३/२ क्षेत्र ०.४२ आकार २.८५ ही शेत मिळकत असून या शेत मिळकतीचे कामी मयताचे वारस लावणे असलेने अर्जदार हिसवारसदाखल्याची आवश्यकता असलेने अर्जदार याने बॉम्बे रेगुलेशान कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी/वारसांचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केला आहे.

त्या अर्थी या नोटीसीने तमाम जनतेस कळविणेत येते की, तमाम जनते पैकी वरील मयताचे अर्जदार हिचे व्येतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर दिनाक १०/१/२०२६ रोजी ठीक सकाळी १०.३० वा स्वत अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फतहजर राहून लेखी स्वरुपात हरकती सादर करावे अन्यथा सदरील अर्जदार यांचा तोंडी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदार यांचे व्यतिरिक्त दुसरे कोणीच मयताचे वारस नाहीत. असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाण पत्र अर्जदार याचे मागणी प्रमाणे देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज रोजी माझ्या सहिनी व कोर्टाचे शिक्कायानिशी प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरून

**कनिष्ट लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.६१३/२०२६, नि.६,

१) कैलास दिनकर पाटील,
२) प्रकाश दिनकर पाटील,
३) सुरेखा संतोष सनेर ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै.दिनकर चैत्राम पाटील हे मौजे-तऱ्हाडकसबे ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेगयुलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/ आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.१७/८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि.२९/०७/२०२६

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे (शिक्का) **सहा.अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो., ज्युनी. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.६३३/२०२६,
नि.नं. , चौ.ता.१९/८/२०२६

१) ताराबाई चंद्रकांत शिंपी, २) शैला जितेंद्र शिंपी,
३) मृणाल जितेंद्र बाविस्कर, ४) जय जितेंद्र बाविस्कर,
सर्व रा.शिंपी गल्ली, खालचेगाव, शिरपूर जि.धुळे ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही ....जाबदेणार
जितेंद्र चंद्रकांत शिंपी,
मयताचा पत्ता- शिंपी गल्ली, खालचेगाव, शिरपूर, जि.धुळे,
मृत्यू दि.३१/१२/२०२५ ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचा मुलगा, अर्जदार नं.२ यांचे पती, अर्जदार नं.३ व ४ यांचे वडील नामे जितेंद्र चंद्रकांत शिंपी हे दि.३१/१२/२०२५ रोजी मौजे शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.१९/८/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरुन प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरुन

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) **सहा.अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो., ज्युनी. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.६५७/२०२६, नि.६
नि.नं. , चौ.ता.२४/८/२०२६

१) मिराबाई भिमराव पाटील, २) मुकेश भिमराव पाटील,
३) गजानन भिमराव पाटील, नं.१ ते ३ रा.कुबे, ता.शिरपूर, जि.धुळे,
४) मिनाबाई दत्तात्रय पाटील,
रा. जुने भामपुर, ता.शिरपूर जि.धुळे ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही. ....जाबदेणार
भिमराव धोंडू पाटील, मयताचा पत्ता- कुवे, शिरपूर, जि.धुळे,
मृत्यू दि.२४/०८/२०१६ ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील नामे भिमराव धोंडू पाटील हे दि.२४/०८/२०१६ रोजी मौजे कुवे, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.२४/८/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरुन प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरुन

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) **सहा.अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर

पान १ वरुन

## मुंबईत अस्थापनांचे परवाने थेट रद्द करण्याऐवजी त्यांना

केले. एवढ्या मोठ्या कँटीनमध्ये तुम्हाला काहीच कसे आढळले नाही, असा प्रश्न न्यायालयाने केला. वकिलांच्या उपस्थितीत फेरतपासणीचे आदेशही दिले. त्यानुसार, वकिलांच्या तपासणीत मंत्रालयातील कँटीनमध्ये माशा आढळल्या आहेत. पाण्याच्या ड्रेनेजच्या जाळ्या उघड्या होत्या. फ्रीजमध्येही अस्वच्छता आढळली. बेसिनचा परिसरही अस्वच्छ असल्याचे वकिलांनी दिलेल्या अहवालात नमूद केले.

वकिलांचा अहवाल सादर झाल्यानंतर झालेल्या सुनावणीत न्यायालयाने एफडीएला चांगलेच धारेवर धरले. आज सकाळच्या सुनावणीत तुम्ही जो अहवाल दिलात त्यात मंत्रालयातील उपहारगृह ९८ टक्के स्वच्छ असल्याचे सांगण्यात आले. विशेष म्हणजे त्यावेळी तुम्ही तब्बल सात तास तपासणी केली होती. त्यानंतर, आज वकिलांनी जी तपासणी केली, त्यात केवळ अर्ध्या तासात एवढ्या त्रुटी आढळल्या आहेत, असे न्यायालयाने म्हटले. फोटोत जे दिसते ते अगदी स्पष्ट आहे. फोटो त्यांच्या अहवालासाठी जास्त स्पष्ट आहेत. एका केळावर काळा डाग दिसलात म्हणून तुम्ही कारवाई केली. मंत्रालयात पाइपलाइन तुटलेली आहे, पाणी जायला जागा नाही, तिथेच भांडी घासता. त्यामुळे, एकतर मंत्रालयाच्या उपहारगृहाचा परवाना रद्द करा अथवा याचिकाकर्त्यांच्या परवाना पूर्ववत करा, असे निर्देशच उच्च न्यायालयाने एफडीएच्या अधिकाऱ्यांना दिले. तुम्ही दूजाभाव करू शकत नाही, तुम्ही सगळ्यांना समान वागणूक दिली पाहिजे. कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही, व्हीव्हीआयपी देखील नाही, असे न्यायालयाने म्हटले. अशाने मुंबईतील आर्धी आस्थापने बंद कराल, असे म्हणत मंत्रालयातील फ्रीजचे फोटो उच्च न्यायालयाकडून कोर्ट रुममध्ये दाखवण्यात आले. यापेक्षा तर चपलांचा स्टँड स्वच्छ असतो, असे म्हणत एफडीएला खडसावले. आम्ही याचिकांसंदर्भात देखील हेच करू शकतो. थेट छोट्या-मोठ्या चुका काढून याचिका फेटाळू शकतो. पण, मंत्रालयातील उपहारगृहात ९८ टक्के नियमांची पूर्तता झाली, ही माहिती कोर्टात दिली, याप्रकरणी आम्ही खोट बोलल्याची कारवाई करू, असे म्हणत उच्च न्यायालयाने खडसावले. मंत्रालयातील उपहारगृहाला देखील नोटीस देण्याच्या सूचना मुंबई उच्च न्यायालयाच्यावतीने करण्यात आल्या आहेत. हॉटेल परवाना रद्द करण्याची कारवाई रद्द करून नोटीस देण्याचं एफडीएने मान्य केले.

## धुळे जिल्ह्यात सर्वत्र पावसाची दमदार हजेरी

आंबोडे गावातील नदीलगत हनुमान मंदिराच्या बाजूला त्यांचे लहानसे हॉटेल आहे. आज सकाळी दहाच्या सुमारास हॉटेलमधील साहित्य काढण्यास त्यांनी सुरुवात केली. साहित्य काढत असताना नदीला अचानक पुर आला. पाण्याच्या लोंढ्यांमध्ये चौघेही ओढले गेले. ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली उमेशसह अन्य एकाला बाहेर काढले. परंतु, आनंदा पारखे, त्यांचा मुलगा दिनेश पारखे हे मात्र पुराच्या पाण्यात वाहून गेले. घटनेची माहिती मिळताच धुळे तालुका पोलीस, जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी धाव घेतली. विशेष पथकाने शोधकार्य सुरू केले. काही तरुणांनी पाण्यात उतरून शोध घेतला. परंतु, दूर अंतरापर्यंत ही दोघी सापडू शकलेले नाही. गावातील काही तरुणांनी नदीच्या किनाऱ्यालगत दुसऱ्या गावापर्यंत पाहणी केली, पण वाहून गेलेले सापडले नाहीत.

### दुचाकीस्वार शिक्षकास वाचवले

धुळे तालुक्यातील नवलनगर जवळ महू नाल्याला महापूर आला. जिल्हा परिषदेच्या मोहाडी येथील केंद्र शाळेचे शिक्षक प्रदीप रायते दुचाकीने जात होते. पाण्याचा अंदाज न आल्यामुळे त्यांनी पूर आलेल्या नाल्यातून दुचाकी काढण्याचा प्रयत्न केला. पाण्याचा वेग जास्त असल्याने दुचाकीसह ते पाण्याच्या प्रवाहामध्ये वाहू लागले. गावातील संतोष पाटील यांच्यासह तीन जणांनी त्यांना वाचवले.

### मुकटी गावात पुराचा थरार

धुळे तालुक्यातील मुकटी गावात देखील पुराचा थरार पहायला मिळाला. मुकटी गावात आज सकाळी घडलेली घटना अंगावर काटा आणणारी ठरली. अचानक आलेल्या पुराच्या लोंढ्यात चार व्यावसायिक वाहून गेले. मात्र एका झाडाचा आधार आणि ग्रामस्थांच्या धाडसी प्रयत्नामुळे तब्बल साडेतीन तासांनंतर चौघांची सुखरूप सुटका करण्यात आली. आज सकाळी मुकटी गावात कान्हेरी नदीला अचानक आलेल्या पुरामुळे संपूर्ण गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले.सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास गावातील संदीप एकनाथ देवरे, गोकुळ माधव देवरे, रावसाहेब देवरे आणि भाऊसाहेब देवरे हे चौघेही किराणा दुकान उघडण्यासाठी जात होते. त्याचवेळी कान्हेरी नदीच्या पुराचा प्रचंड लोंढा आल्याने चौघेही पाण्यात वाहून गेले. वाहून जात असताना काही अंतरावर असलेल्या एका झाडाचा आधार मिळाल्याने चौघांनी जीवाच्या आकांताने झाडाला धरून ठेवले. घटनेची माहिती मिळताच मुकटी गावातील ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.दोरखंड, बांबू आणि उपलब्ध साहित्याच्या मदतीने ग्रामस्थांनी जीवाची पर्वा न करता बचावकार्य सुरू केले. तब्बल साडेतीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर चारही व्यावसायिकांची सुखरूप सुटका करण्यात आली. या घटनेची माहिती संदीप एकनाथ देवरे यांनी दूरध्वनीद्वारे प्रशासनास दिली. मुसळधार पावसामुळे मुकटी गावाला पुराचा वेढा पडला असून अनेक घरांमध्ये पाणी शिरले आहे. अनेक नागरिकांचे संसारोपयोगी साहित्य, दुचाकी आणि इतर वाहनेही पुराच्या पाण्यात वाहून गेल्याचे समोर आले आहे.

### प्रशासनाच्या संथपणावर नाराजी

मुकटी ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, पूरस्थितीची माहिती संबंधित विभागाला देण्यात आली होती. मात्र वेळेवर मदत न मिळाल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मुकटी गावातील ही घटना अतिवृष्टीच्या काळात सतर्क राहण्याची गंभीर सूचना देणारी ठरली आहे. हवामान विभागाने पुढील काही तासही मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने नदी-नाल्यांच्या परिसरातील नागरिकांनी अत्यंत दक्षता बाळगावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

### अक्कलपाडा धरणाचे सात दरवाजे उघडले

दरम्यान, साक्री तालुक्यातील लाटीपाडा, काबऱ्या खडक आणि मालनगाव धरणे पूर्ण क्षमतेने भरले. त्यामुळे धरणांमधील पाणी पांझरा नदीवरील अक्कलपाडा धरणात येत आहे. येणाऱ्या काही दिवसात पाऊस होणार असल्याने अक्कलपाडा धरणाचे सात दरवाजे ०.५० मीटर उंचीपर्यंत उघडण्यात आले आहेत. त्यामुळे पांझरेच्या पात्रात दोन हजार ७४५ क्युसेस पाण्याचा विसर्ग होत आहे. पाण्याच्या विसर्गात वाढ होणार असल्याने नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होणार आहे. त्यामुळे कदाचित पांझरा नदीवर ज्योती चित्रमंदिर जवळ असलेल्या कमी उंचीची पुल वाहतुकीसाठी रात्री उशीरापर्यंत बंद होण्याची शक्यता आहे. नदी नाल्यांना पुर येण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी कमी उंचीच्या पुलांवरून वाहतुक करू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### धुळ्यात साचलेल्या पाण्याची समस्या

धुळे शहरासह जिल्ह्यात गुरूवारी रात्री अकराच्या सुमारास पावसाला सुरूवात झाली. रात्रभर शहरासह जिल्ह्यात कमी-अधिक प्रमाणात संततधार पाऊस झाला. सलग सात ते दहा तास पाऊस झाल्याने सर्वत्र पाणीचपाणी झाले. शहरातील पोलिस मुख्यालय, जिल्हा रूग्णालय, गल्ली क्रमांक चार, पाच, सहा, सातच्या सखल भगात पाणी साचले. पोलिस मुख्यालयात जाणाऱ्या आणि जिल्हा रूग्णालयात जाणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना साचलेल्या पाण्यातून वाट काढण्याची वेळ आली. पावसामुळे नदी-नाल्याच्या पात्रात पाणी वाढल्याने धुळे तालुक्यातील भिरडाई गावाचा मुख्यालय असलेल्या धुळ्याशी काहीकाळ संपर्क सुटला होता. दुपारी दोन नंतर पावसाचा वेग कमी झाल्याने सखल भागातील नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. पण, हवमान खात्याने शुक्रवारी रात्री आणि शनिवारी दिवसभरात पाऊस होईल, असा अंदाज व्यक्त केला आहे. त्याम ुळे सखल भागातील नागरिकांकडून काहीशी चिंता व्यक्त केली जात आहे. नदी-नाल्यावर असलेल्या कमी उंचीच्या पुलावरून वाहतुक करू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

पान १ वरुन

## भिवंडीत इमारत कोसळून दहा जणांचा जागीच मृत्यू

परिसरातील कोहिनूर इमारत दुर्घटनेत उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यातील एकाच गावातील चार कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेत दोन सख्खे भाऊ, त्यांचा मामाचा मुलगा आणि एका नातेवाईकाचे निधन झाल्याने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. मृत्यूनंतरही या कुटुंबियांच्या मरणयातना काही कमी झाल्याचे दिसत नाही. कारण, मृत व्यक्तींचे मृतदेह त्यांच्या मूळ गावी नेण्यासाठी मोठा खर्च येत असल्याने मृतांच्या कुटुंबीयांनी प्रशासनाकडे मदतीची आर्त हाक दिली आहे.

इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेतील मृतांमध्ये अशोक कुमार पासवान, त्याचा सख्खा भाऊ राकेश कुमार पासवान, मामाचा मुलगा मुकेश पासवान आणि किस कुमार यांचा समावेश आहे. उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यातील एकाच गावचे हे सर्व रहिवासी होते. भिवंडीतील कोहिनूर इमारतीच्या दुरुस्तीच्या कामासाठी ते चार दिवसांपासून येथे काम करत होते. मात्र, गुरुवारी अचानक इमारत कोसळल्याने ढिगाऱ्याखाली अडकून चौघांचाही मृत्यू झाला. अशोककुमार पासवान हा आपल्या कुटुंबातील एकमेव कमावणारा सदस्य होता. त्याची पत्नी आणि तीन लहान मुले त्याच्यावरच अवलंबून होती. त्याचा भाऊ राकेशही त्याला कामात मदत करत होता. मात्र, इमारत कोसळल्याच्या दुर्घटनेने एका क्षणात दोन्ही भावांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले आहे. अशोकची पत्नी आणि मुलांचा आक्रोश पाहून उपस्थितांच्या डोळ्यांतही अश्रू आले. दरम्यान, चारही मृतदेह उत्तर प्रदेशातील गावी नेण्यासाठी सुमारे एक लाख २० हजार रुपयांचा खर्च सांगितला जात असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली आहे. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यांनी प्रशासनाकडे ॲम्बुलन्सद्वारे मृतदेह मोफत गावी पोहोचवण्याची मदत करण्याची विनंती केली आहे. या दुर्घटनेने केवळ चार कामगारांचे जीव घेतले नाहीत तर उत्तर प्रदेशातील एका गावातील चार कुटुंबांचा आधार हिरावून घेतल्याने संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. दरम्यान, राज्यात २४ तासांत ११ जणांचा मृत्यू जणांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहेत. दरम्यान, राज्यातील विविध भागात मुसळधार पाऊस आणि झाडपडीच्या घटना घडल्या आहेत. कुठे दरड कोसळली तर कुठे रस्ता खचल्याही घटना घडल्या आहेत. पूर, आणि पडझडीच्या या आपत्तीच्या घटनांमध्ये मागील चोवीस तासात राज्यात ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून पूरपरिस्थितीचा आढावा

नाल्याकाठावरील गावांतील नागरिक अडकून पडणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. आवश्यकतेनुसार नागरिकांचे तातडीने सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे. स्थलांतरित नागरिकांच्या निवास, भोजन, पिण्याचे पाणी, औषधोपचार व इतर अत्यावश्यक सुविधांची चोख व्यवस्था करावी. तसेच आवश्यक जीवनावश्यक वस्तूंचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या. नदीकाठच्या तसेच सखल भागातील नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी. पाण्याखाली आलेले रस्ते, पूल अथवा पाण्याखाली गेलेल्या मार्गांवरून प्रवास करू नये. लहान मुले व जनावरे नदी, नाले आणि ओढ्यांच्या परिसरात जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी. हवामान विभाग व जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी तात्काळ जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष अथवा संबंधित तालुका प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी यावेळी केले.

## बिलाडी धरणामुळे पुनर्वसनासाठी

गावकऱ्यांनी सध्या स्थितीत खामगाव ते मुंबई पायी मोर्चा आणि आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला. यावेळी खामगाव चे सरपंच राजेश वसावे, बापू ठाकरे, राजू नहेरे, सनी पाटील, प्रवीण सावडे, प्रशांत नहेरे, संजू नंदन, जयवंत माळी, संजू वळवी, भास्कर पाटील, रमण वसावे, संजू वसावे, संजू पाटील, नरेंद्र पाटील, अजित भिल, छगन भिल, रमेश पाडवी, सुकेश भिल, धर्मेश भिल व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भर पावसात काढण्यात आलेल्या या मोर्चामुळे शासन दरबारी खामगावच्या प्रश्नाला आता गती मिळण्याची शक्यता आहे.

## अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

ताडी विक्रीचे ठिकाण अत्यंत अस्वच्छ स्थितीत होते. या गंभीर उल्लंघनाची दखल घेत अधिकाऱ्यांनी अंदाजे २ हजार २८० रुपये मूल्याची ३८ लिटर ताडी तात्काळ नष्ट केली. संबंधित दोषी विक्रेत्यावर कायद्यातील नियमांनुसार पुढील कठोर कायदेशीर कारवाई केली जात आहे.

## वीस ह.ची लाच घेतांना समाज कल्याण

कार्यालयात तक्रार दिली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने धुळे येथील समाज कल्याण कार्यालयात सापळा रचला, आज सायंकाळी तक्रारदाराकडून २० हजार रुपयांची लाचेची रक्कम स्विकारताना पथकाने अधिकारी विशाल चौधरी यास पकडले. एसीबीने अधिकाऱ्याला ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून लाचेची रक्कमही जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत पोलिसांकडून सुरू होते.

## दानपेटी चोरणाऱ्या दोघांना मध्यप्रदेशातून पकडले

एक लाख दोन हजार रुपयांच्या चांदीच्या पाटल्या, ३६ हजार ८०० रुपयांचे चांदीचे कडे, जोडवे, ब्रेसलेट, साखळी, हार, छत्री व घरफोडीचे साहित्य असा एकूण सात लाख ८३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कामगिरीबद्दल पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर अधीक्षक अजय देवरे, डीवायएसपी सुधीर पाटील यांनी निरीक्षक किशोरकुमार परदेशी, उपनिरीक्षक जितेंद्र महाजन, हवालदार रवींद्र आखडमल, अतुल पाटील, योगेश दाभाडे, गोविंद कोळी, विनोद आखडमल, मनोज महाजन, सचिन वाघ, प्रशांत पवार, मनोज दाभाडे, भटू साळुंखे, आरीफ तडवी, सोमा ठाकरे, उमेश पवार, अनिता पावरा, चित्रा पावरा यांचे कौतुक केले.

## नंदुरबारला घरफोडी सोन्याचे दागिने चोरले

कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील ४८,००० रुपये किमतीचे ४.०५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप (जोडवे) लंपास केले.

या प्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेका नारायण भिल करीत आहेत

## केळीची बोगस फळबाग दाखवून

दिल्याने कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली. परंतु त्यावर काहीच कार्यवाही न झाल्यामुळे अरुणाबेन पाटील यांनी २० जुलैपासून उपोषणाला सुरुवात केली. ११ दिवस उपोषण केल्यानंतर कृषी विभागाने दखल घेऊन गुन्हा दाखल केला.

## बाभळे एमआयडीसीत शिंदखेडा पोलिसांचा छापा

शिंदखेडा पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद क्रमांक २०२/२०२६ बीएनएस () कलम १२३, २७४, २७५, ३(५) सह महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई), ८१, ८३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही यशस्वी कामगिरी धुळे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे व उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मयूर भामरे, पो.उ.नि. संदीप ढाकणे, म.पो.उ.नि. माया राजपूत तसेच पोलीस अंमलदार प्रशांत पवार, हेमराज जाधव, नागेश शिरसाठ, रुपेश चौधरी, गणेश सोनवणे, चेतन माळी व कमलेश कोठावदे यांच्या पथकाने केली.

निधन वार्ता

### अहिल्याबाई पाटील

धुळे, दि.३१- कापडणे ता. धुळे येथील अहिल्याबाई आसाराम पाटील-जानवेकर यांचे वृद्धापकाळने निधन झाले.



मृत्यूसमयी त्या ९२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगी, जावाई, नातसून, नातू असा परिवार आहे. त्या प्रगतिशील शेतकरी व शेतकरी संघटनेचे धुळे जिल्हा माजी जिल्हाध्यक्ष आत्माराम बळीराम पाटील यांच्या सासु, सामाजिक कार्यकर्ते संदीप पाटील आणि नरेंद्र पाटील यांच्या आजी होत.

### भगवान गांगुर्डे

तऱ्हाडी, दि.३१- शिरपूर तालुक्यातील तऱ्हाडी येथील रहिवासी भगवान खंडू गांगुर्डे यांचे निधन झाले.



मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात, दोन मुले चार मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. ज्ञानेश्वर गांगुर्डे, न्याहली येथील उपशिक्षक व ग्रामपंचायत उपसरपंच अशोक पाटील यांचे ते वडील होत.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान


**दुकान भाड्याने देणे**
दुकान भाड्याने देणे आहे. पंटवटी आग्रा रोड, देवपूर, धुळे 9309445441 8329366624

**प्लॉट विकणे आहे**
साईग्राम नगर वरखेडी जवळ प्लॉट विकणे आहे. 9371666969

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी हुशार व होतकरु मुले/मुली फूलटाईम/पार्टटाईम त्वरीत पाहिजेत. - समक्ष भेटा - मुंदडा बुक स्टॉल पारोळा रोड ग.नं. ६, कॉर्नर, धुळे

**भाड्याने देणे आहे**
धुळे अवधान येथील MIDC येथील ई.७४ या प्लॉट मध्ये १००० ते १२०० चौ.फुटाची शेड भाड्याने देणे आहे. संपर्क श्री.द्रुमिल जोशी 9423982170 श्री.आशुतोष जोशी 9422289520

**पाहिजेत**
दुकान कामाकरीता मुले पाहिजेत. -: संपर्क :- 9823241749 9422285089

**पाहिजेत**
कामासाठी हेल्पर मुलगी पाहिजे. समक्ष भेटा! किड्स् शॉपी टॉवर गार्डन जवळ, कॉंग्रेस भवनासमोर, धुळे 9422219164

**पाहिजेत**
होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) सेल्समन
३) दुकान काम हेल्पर
अनुभव असल्यास प्राधान्य. -: संपर्क :- 8888096777



पान १ वरुन


## नंदुरबार जि. संततधार जनजीवन विस्कळीत

आले आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे अनेक नाले व ओढे दुथडी भरून वाहत असून सखल भागांमध्ये पाणी साचल्याचे चित्र आहे. नागरिकांनी पूरस्थिती असलेल्या ठिकाणी जाणे टाळावे, तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

पूर्ण केली असून १८ हजार ३५५ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे सर्व पात्र शेतकऱ्यांनी विलंब न करता ई-केवायसी पूर्ण करावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच प्रलंबित आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्यासाठी संबंधित बँकांनी पात्र शेतकऱ्यांशी संपर्क साधून ई-केवायसीला प्राधान्य द्यावे आणि हे काम रविवारपर्यंत पूर्ण करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. जिल्हा उपनिबंधक मनोज चौधरी यांनी सांगितले की, पात्र शेतकऱ्यांच्या याद्या संबंधित बँक शाखांमध्ये उपलब्ध आहेत. प्रत्येक शाखेत आधार प्रमाणीकरणाची कार्यपद्धती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## मनपा सहआयुक्त वाघ यांना मारहाण

फळ विक्रीच्या दुकानासमोर सार्वजनिक जागेवर फळांचे कॅरेट ठेवले. रस्त्यावर व्यवसाय करत असल्याने मनपाने ७५० रूपयांची बाजार फी म्हणून जुन व जुलै अशा दोन महिन्याची मासिक पावती दिली. बाजार फी वसुलीसाठी मनपाचे वसुली करणारे भुषण जगदाळे गेले असता फळ विक्रेता विशाल शिंदे याने नकार दिला. याबाबत माहिती मिळताच मनपाचे पथक साक्री रोडवरील फळविक्रेत्याच्या दुकानावर दाखल झाले. बाजार फी भरण्यास फळविक्रेत्याला सहा.आयुक्त किशोर वाघ यांनी सांगितले असता पुन्हा नकार दिला. जप्ती पथकातील कर्मचाऱ्याला वजन काटा उचलल्याच्या सुचना अधिकाऱ्यांनी सुमित आव्हाड यास केल्या. त्यानुसार आव्हाड पुढे सरकताच वजन काटयाला हात लावल्यास वाईट परिणाम होतील असे धमकावत विशाल शिंदे याने वजन काट्यावरील भांडे मारल्याने पायाला दुखापत झाली. याप्रकरणी विक्रेत्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





**पाहिजेत**
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्टोमेट्रीस्ट
संपर्क यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय दत्त मंदीर देवपूर, धुळे मो. ८३२९२४९३८६

**पाहिजेत**
हॉटेल प्रितम रेस्टरनसाठी मॅनेजर पाहिजे. अनुभवी कॉम्प्युटरचे ज्ञान असणे आवश्यक. साक्री रोड, नविन महापालिका समोर, धुळे 9765901313

**सेल सेल सेल**
बेडशीटस, दोहड, ब्लँकेटस, प्रोटेक्टर (गादी कवर) मर्यादित वेळा करीता. सीमा हॅण्डलुम पारोळा रोड, धुळे

**पाहिजेत**
दुकान कामाकरीता अनुभवी माणूस : २ टॅली ऑपरेटर पार्ट टाईम अनुभवी : २ दि भारत एजन्सीज पारोळा रोड, गल्ली नं.५, धुळे

**विकणे आहे**
वलवाडी गोंदुर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे. 9011894666

**पाहिजेत**
ऑफिस असिस्टंट पाहिजेत शिक्षण योग्यता कॉम्प्युटर ज्ञानानुसार पगार दिला जाईल. -: संपर्क :- वानखेडे 7843078387

**WANTED**
Experienced Pharmacist Minimum 1 year Experience Contact 8788637592





हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०